**International Journal of Multidisciplinary Research and Development**
**Online ISSN: 2349-4182, Print ISSN: 2349-5979, Impact Factor: RJIF 5.72**
**www.allsubjectjournal.com**
**Volume 3; Issue 7; July 2016; Page No. 85-87**

# माहितीचा अधिकार–कलम 4 ची प्रभावी अंमलबजावणी : एक मुल्यांकन

**डॉ० नलिनी के० टेंभेकर**

सह० प्राध्यापक, इतिहास विभाग, शासकीय ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती, महाराष्ट, भारत।

**सारांश**

भारतीय राज्यघटनेतील तरतुदी, स्वयंसेवी संस्थांचे कार्य, जागतिकीकरणाचा रेटा इत्यादींमुळे जनमत अनुकूल बनून 15 जून 2015 ला माहितीचा अधिकार अधिनियम पारीत झाला। ह्या कायद्यातील कलम 4 अंतर्गत असलेली 17 प्रकारची माहिती प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अद्यावत ठेवणे त्यांच्यावर बंधनकारक करण्यात आले। ह्या कायद्याद्वारे सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यात अधिकाधित पारदर्शकता आणणे अपेक्षित आहे। दहा वर्षानंतर 2015 मध्ये सार्वजनिक प्राधिकरणात माहितीचा अधिकार कायद्यातील कलम–4 ची कितपत प्रभावी अंमलबजावणी होते। याची पहानी केली असता अमरावती शहरात ते प्रमाण 45 ते 55 टक्क्यापर्यंत आढळून आले। भारतातील लोकशाही खऱ्या अर्थाने सक्षम होण्यासाठी कलम चार ची अधिक प्रभावीरित्या अंमलबजावनी होणे गरजेचे आहे।

**मूलशब्द** : माहितीची पारदर्शिता, सार्वजनिक प्राधिकरण, अभिलेख, माहिती, माहितीचा अधिकार

**प्रस्तावना**

भारत हे एक लोकशाही राष्ट्र आहे। कोणत्याही देशात खऱ्या अर्थाने लोकशाही राबविण्यासाठी, माहितगार नागरिक आणि माहितीची पारदर्शिता असणे ही अनिवार्य अट आहे। त्यादृष्टीने भारतीय प्रशासनात अधिकाधिक पारदर्शिता आणण्यासाठी व लोकशाहीची यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्यासाठी भारतीय गणराज्याच्या छप्पनाव्या वर्षी 'माहितीचा अधिकार अधिनियम 2005' पारित करण्यात आला। माहितीचा अधिकार याचा अर्थ, कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार असा आहे।

**माहितीचा अधिकार अधिनियम, 2005**
**(2005 चा अधिनियम क्रमांक – 22)**
**कायदा अंमलबजावणीस प्रारंभ**

माहितीचा अधिकार विधेयकाला राष्ट्रपतींची मान्यता 15 जून 2005 ला मिळाली। आणि 12 ऑक्टोंबर 2005 पासून जम्मू व काश्मीर वगळता हा नवीन कायदा महाराष्ट्रासह संपुर्ण भारताच्या नागरिकांसाठी लागू झाला।कायद्यात एकूण सहा प्रकरणे व 31 कलमे आहेत। यातील काही कलमे अधिनियम अमलात आल्यापासून लागू झालीत त्यात कलम–4 चा समावेश आहे। इतर कलमे 120 दिवसांनतर लागू करण्यात आली।[1]

**माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कायद्याचे उद्देश**

1. प्रशासकीय कामकाजामध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणणे।
2. शासन कारभारात उत्तरदायित्व निर्माण करणे।
3. सार्वजनिक जीवनातील भ्रष्टाचार कमी करणे।
4. सार्वजनिक प्राधिकरणांच्या नियंत्रणाखालील माहिती नागरिकांना मिळविण्यासाठी व्यवहार्य शासनपध्दत आखून देणे।[2]

**माहितीचा अधिकार अधिनियम व कलम – 4शी संबधीत काही महत्वपूर्ण व्याख्या**

**माहिती** [3] : याचा अर्थ, कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज ज्ञापने, इ–मेल अभिप्राय, सूचना, प्रसिध्दपत्रके, परिपत्रके आदेश रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने, (मॉडेल) अशा कोणत्याही स्वरूपातील सामुग्री आणि कोणत्याही खाजगी विकासाशी संबंधित माहिती यांचा समावेश होतो।

**अभिलेख** [4] : यामध्ये,
1. कोणताही दस्तऐवज, हस्तलिखित व फाईल, मायक्रोफिल्म, मायक्रोफिश,
2. संगणकाद्वारे किंवा कोणत्याही अन्य उपकरणाद्वारे तयार केलेले कोणतेही अन्य साहित्य यांचा समावेश होतो।

**सार्वजनिक प्राधिकरण** [5] : माहितीचा अधिकार कायदयाने सार्वजनिक प्राधिकरण ही नवी संकल्पना अस्तित्वात आणली आहे। देशात सर्वत्र असलेली शासकीय कार्यालये व शासनाचे अनुदान मिळणाऱ्या शासकीय संस्था, यांचा यात समावेश होतो। त्याबरोबरच भारतीय राज्य घटनेने निर्माण केलेल्या अथवा केंद्र व राज्य सरकारांनी काढलेल्या अधिसूचनेद्वारे स्थापन करण्यात आलेल्या कोणत्याही प्राधिकरण मंडळ किंवा संस्थेचा या संज्ञेत समावेश होतो।

**माहितीचा अधिकार** [6] : कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार।

उदा। एखादे काम, दस्तऐवज अभिलेख (रेकॉर्डस) यांची पाहणी करणे। त्यांच्या प्रमाणित प्रती घेणे,सामग्रीचे प्रमाणित नमुने (सम्पल्स) घेणे, माहिती जर संगणकात साठविलेली असेल तर त्याच्या मुद्रित प्रती (प्रिंट आऊट) मिळविणे।

**माहिती अधिकार कायदयातील कलम–4**

**महत्व** : माहिती अधिकार कायदयाचीं प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने कलम – 4 महत्वाचीं भूमिका बजावतो। सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेली माहिती, देशातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने, हा अधिनियम कलम–4 द्वारे सार्वजनिक प्राधिकरणांवर महत्वाची आ–बंधने लादतो। सार्वजनिक प्राधिकरणांवरील ही आ–बंधने मुलतः प्राधिकरणाच्या प्रमुखावर आहेत। हे काम मनःपूर्वक पार पाडले जात आहे, याची खात्री त्याने करणे आवश्यक आहे। या मार्गदर्शिकेमध्ये जिथे सार्वजनिक प्राधिकरण हा संदर्भ आहे, वस्तुतः तो संदर्भ सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रमुखासाठी आहे।[7]

**गरज** : या अधिनियमातील तरतुदीची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने अभिलेखाचे योग्य वर्गीकरण, व्यवस्थापन, जतन व संगणीकीकरण होणे आवश्यक आहे। जेणे करून इच्छुक व्यक्तिला निर्धारित वेळेत हवी ती माहिती मिळविणे सोयीचे होईल। कलम 4 मध्ये त्या संबंधिच्या तरतुदीचा समावेश केला गेला आहे।

**उद्देश : स्वयं प्रेरणेने माहितीचे प्रकटीकरण**

माहिती मिळविण्यासाठी लोकांना या अधिनियमाचा कमीत कमी आधार घ्यावा लागावा यासाठी प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने नियमित कालांतराने इंटरनेटसह संपर्काच्या विविध साधनांद्वारे (सुचना फलक, वृत्त प्रसारणे, पुस्तिका, जाहीर घोषणा, प्रसार माध्यमे) माहिती पुरवेल। जेणे करून शासकीय कामकाजात पारदर्शकता निर्माण होईल, सामाजिक लेखा–जोखा ठेवता येईल व सुशासनाकडे अग्रेसर होण्याचा मार्ग खुला होईल।[8]

**कलम 4 : सार्वजनिक प्राधिकरणावरील आ–बंधने** [9]

1. प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण –

**क)** या अधिनियमांन्वये देण्यात आलेला माहितीचा अधिकार मिळणे सोयीचे होईल अशा रितीने आणि स्वरूपात सर्व अभिलेख योग्य रितीने सुचीबध्द करील आणि त्याची निर्देशसुची तयार करील आणि याचे संगणीकरण करणे योग्य आहे। अशा सर्व अभिलेखांचे वाजवी कालावधीत आणि साधन संपत्तीच्या उपलब्धतेनुसार संगणीकीकरण केले जात आहे याची आणि असे अभिलेख पाहावयास मिळणे सोयीचे व्हावे म्हणून संपूर्ण देशातील विविध प्रणालीमध्ये नेटवर्क मार्फत ते जोडले जात आहेत याची खातर जमा करील।

**ख)** हा अधिनियम अधिनियमित झाल्यापासून 120 दिवसाच्या आत –

**(एक)** आपली रचना, कार्ये व कर्तव्य याचा तपशिल

**(दोन)** आपले अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये।

**(तीन)** निर्णय घेण्याच्या प्रक्रीयेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती, तसेच पर्यवेक्षण उत्तर दायित्व प्रणाली।

**(चार)** स्वतःची कार्ये पार पाडण्यासाठी त्यांच्याकडून ठरविण्यात आलेली मानके।

**(पाच)** कर्मचारी वर्गाकडून वापरण्यात येणारे विनीयम, सूचीनियम पुस्तिका व आणि अभिलेख।

**(सहा)** त्याच्याकडे असलेल्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजाच्या प्रवर्गाचे विवरण

**(सात)** आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधी लोकांशी विचार विनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशिल।

**(आठ)** प्राधिकरणातील विविध मंडळाचे, परिषदांचे, समित्यांचे आणि अन्य निकायांचे विवरण आणि त्या मंडळाच्या परिषदाच्या, समित्यांच्या आणि निकायांच्या बैठकी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे किंवा अशा बैठकींची कार्यवृत्त जनतेला पाहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण।

**(नऊ)** आपल्या अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची निर्देशिका।

**(दहा)** आपल्या प्रत्येक अधिकाऱ्याला व कर्मचाऱ्याला मिळणारे मासिक वेतन, तसेच प्राधिकरणाच्या विनियमांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे नुकसान, भरपाई देण्याची पध्दती।

**(अकरा)** सर्व योजनांचा तपशिल, प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमून दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरीत केलेल्या रकमांचा अहवाल।

**(बारा)** अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रीत तसेच वाटप केलेल्या रकमा आणि अशा कार्यक्रमाच्या लाभाधिकाऱ्यांचा तपशिल।

**(तेरा)** ज्या व्यक्तींना सवलती, परवाने किंवा प्राधिकार पत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशिल।

**(चौदा)** इलेक्ट्रानिक स्वरूपात त्यास उपलब्ध असलेल्या किंवा त्याच्याकडे असलेल्या माहितीच्या संबंधातील तपशिल

**(पंधरा)** माहिती मिळविण्यासाठी नागरीकांना उपलब्ध असणाऱ्या सुविधांचा तपशिल, तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशिल।

**(सोळा)** जनमाहिती अधिकाऱ्यांची नांवे,पदनामे आणि इतर तपशिल।

**(सतरा)** विहीत करण्यातील अशी इतर माहिती।

**कलम 4(2)**

माहिती मिळविण्यासाठी लोकांना या अधिनियमाचा कमीत कमी आधार घ्यावा लागावा यासाठी नियमित कालांतराने लोकांना इंटरनेटसह संपर्काच्या विविध साधनाद्वारे स्वतःहून माहिती पुरविण्यासाठी आवष्यकतेनुसार उपाययोजना करण्यासाठी प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण सतत प्रयत्नषिल राहील।

**कलम 4(3)**

प्रत्येक माहिती विस्तृत प्रमाणात लोकांना सहजपणे उपलब्ध होईल अशा स्वरूपात आणि अशा रितीने प्रसारीत करण्यात येईल।

**स्पष्टीकरण** [10]

कलम 4(1) (ख) माहितीचा अधिकार कायदया मध्ये कलम 4 प्रमाणे प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने कोणती माहिती जाहीर करावयाची याचे स्पष्टीकरण आहे। त्यासाठी या कायदयात 17 मुद्दे दिले आहेत। ही माहिती कोणीही मागितली नाही तरी कायदेशीर जबाबदारी म्हणुन प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने स्वतःहुन दयावयाची आहे। अशी स्वतःहुन जाहीर केलेली माहिती म्हणजे त्या सार्वजनिक प्राधिकरणाचा तपशीलवार परिचयच असतो। या मध्ये त्या सार्वजनिक प्राधिकरणाचे कार्यक्षेत्र, संघटन तक्ता, अधिकाऱ्यांची नावे, पत्ते, दुरध्वनी क्रमांक, वेगवेगळया कामासाठी वापरण्यात येणाऱ्या कार्यपद्धती, त्यासाठीचे कायदे, नियम, अभिलेख, सुविधा, सवलती, सबसीडी योजना, योजनांचे लाभार्थी, लाभार्थी निवडण्याचे निकष, अर्थ संकल्प, खर्चाच्या बाबी, इत्यादी सर्व मुद्दयांवरील तपशीलवार माहितीचा समावेश आहे।

अशी माहिती नागरीकांपर्यंत पोहचावी यासाठी ती नागरीकांना समजणाऱ्या भाशेतच असली पाहिजे। शिवाय ती सुचना फलकाच्या माध्यमातुन व्यापक स्वरूपात प्रसारीत केली पाहिजे व ती सतत अद्ययावत केली गेली पहिजे।

**परिणाम**

कलम 4 (1) (ख) मधील 17 प्रकारची माहिती अद्यावत ठेवली तर

(1) माहिती अधिकार कायदया अंर्तगत अर्जदाराला अभिलेखांच्या निरीक्षणाची संधी उपलब्ध करून दयावी लागते, ती सहज पणे उपलब्ध करून देता येईल।
(2) भुतकाळातील निर्णय व कार्यपध्दतीचे अध्ययन करणे, अभिलेखांमुळे शक्य होते। त्यामुळे योग्य तो प्रशासकिय निर्णय घेणे संबंधीत अधिकाऱ्यांना शक्य होईल
(3) मानवी स्मरण शक्तीच्या मर्यादेमुळे अभिलेखांचा संख्यात्मक स्मरणशक्ती म्हणुन उपयोग होतो। त्यामुळे प्रशासना पुढील समस्या सोडविणे व अचुकपणे निर्णय घेणे शक्य होते।

(4) तत्परतेने माहिती शोधणे (Retrieval) व ती माहिती मागणाऱ्याला पुरविणे किंवा निर्णय प्रक्रियेसाठी उपलब्ध करणे त्यामुळे शक्य होईल।
(5) उत्तम अभिलेख व्यवस्थापन माहिती अधिकाराच्या उत्तम अंमल बजावणीस सहाय्यकारी ठरते। वरील 17 प्रकारची माहिती अद्यावत ठेवली तर खुले, प्रतिसादात्मक आणि उत्तरदायी प्रशासन निर्माण होवू शकेल [11]

**कलम – 4 ची पूर्तता न केल्यास**

कलम 4(1)(ख) नुसार प्रसिद्ध करावयाची माहिती आता ऐच्छिक बाब राहीली नाही। प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने या बाबींचे पालन करणे माहिती अधिकार अधिनियमानुसार बंधनकारक आहे। पालन न केल्यास अधिनियमास अभिप्रेत असलेले कार्यालयीन कामकाजातील पारदर्शिता हे उद्दिष्ट पूर्ण होत नाही। करीता आयुक्ताकडे तक्रार करता येते।[12]

**अंमलबजावणी**

विविध सार्वजनिक प्राधिकरणात माहितीचा अधिकार कायदयातील कलम 4 मधील 17 प्रकारच्या तरतुदीचीं कितपत प्रभावी अमंलबजावणी करण्यात येते। या संबंधि सर्वेक्षण करण्यासाठी अमरावती शहरातील तहसिल कार्यालय अमरावती, भारत संचार निगम लिमिटेड अमरावती, टपाल विभाग अमरावती, महानगरपालिका अमरावती, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती।या पाच सार्वजनिक प्रधिकरणांची निवड करण्यात आली।

सार्वजनिक प्राधिकरणांतील कलम चारच्या प्रभावी अमंलबजावणीची पडताळणी करण्यासाठी पाच प्रधिकरणांना भेट दिली असता, सर्वच प्राधिकरणांतील जनमाहिती अधिकारी, सहायक जनमाहिती अधिकारी, अपिलिय अधिकारी, सहायक जनमाहिती अधिकारी नियुक्त केले होते। दस्तऐवज व अभिलेखांचे जतन कोणत्या ना कोणत्या स्वरूपात केलेले दिसून आले। प्राधिकरणांशी संबंधित बरीच माहिती वेबसाईटवर टाकलेली आहे। तहसिल कार्यालय, महानगरपालिका हया ठिकाणी जनमाहितीसाठी फलक लावलेले होते। तरी वरील सर्व प्राधिकरणात वार्षिक अंदाजपत्रक शासनाकडून आलेला निधि, विविध योजनांवर झालेला खर्च, अधिकारी, कर्मचारी यांची कार्ये, कर्तव्ये, वेतन, प्राधिकरणातील कामकाज सुरळीत चालण्यासाठी ठरविण्यात आलेली मानके, नियम यांचे जाहीर प्रकटन केलेले दिसून येत नाही। एकंदरीत सर्वच प्राधिकरणात 45 ते 55% प्रमाणात नियमांची अमंलबजावणी झालेली दिसून येते।

जनमाहिती अधिकाऱ्यांशी कलम 4च्या प्रभावी अमंलबजावणी विषयी चर्चा केली असता, कार्यालयात जागे अभावी आणि काही तांत्रिक अडचणींमुळे सर्वच गोष्टींचे जाहीर प्रकटीकरण करणे शक्य होत नाही असे सांगण्यात आले। मात्र प्राधिकरणांनी प्रामाणिक प्रयत्न केले तर त्यांना प्राधिकरणांची रचना, कार्ये, कर्तव्ये, अधिकाऱ्यांची, कर्मचाऱ्यांची कार्ये कर्तव्ये, नेमून दिलेली कामे, उद्दिश्टये पूर्ण करण्याकरिता निश्चित केलेला कालावधी, शासनाच्या विविध योजना, त्यासाठी ठरवून दिलेला निधी, लाभार्थ्यांची यादी, यासारख्या गोष्टींचे जाहीर प्रकटीकरण करणे सहज शक्य आहे, जेणेकरून जनतेपर्यंत माहिती सहजपणे पोहचू शकेल व कामकाजातील पारदर्शकता स्पष्ट होईल। कायदयाने तसे करणे बंधनकारक आहे।

**निष्कर्ष**

प्राचीन काळात प्रजेला माहिती देण्यासाठी, राजाचे आदेश, सुचना सार्वजनिक करण्यासाठी गावागावात दवंडी फिरवली जात असे। ब्रिटिश काळात ही पध्दती संपुष्टात आली। परकीय शासनव्यवस्था असल्याने माहिती दडविण्याकडे शासनाचा कल असे। गोपनियतेच्या नावाखाली बरीच माहिती दडवून ठेवली जात असे। 1947 ला स्वतंत्र झालेल्या भारताने लोकशाहीचा स्विकार केल्याने षासनाची सर्वोच्च सत्ता जनतेत विहीत झाली। तरी ब्रिटीश काळापासून सुरू असलेल्या प्रशासकीय यंत्रणेत फारसा बदल झाला नसल्याने माहिती पुरविण्याच्या बाबतीत पुर्वी सारखीच स्थिती राहिली। पारदर्शकतेच्या अभावामुळे जनतेला प्राधिकरणांकडून आवष्यक ती माहिती मिळविणे कठीण होऊन बसले। त्यातुन माहितीचा अधिकार कायदयाची आवश्यकता निर्माण झाली।

भारतीय राज्यघटनेतील तरतुदी, जागतिकीकरणाचा रेटा, स्वंयसेवी संस्थांचे कार्य, कृतीगटाचा संघर्ष इत्यादीमुळे जनमत अनुकुल बनुन 15 जून 2005 ला माहितीचा अधिकार अधिनियम पारीत झाला। हया कायदयाची प्रभावी अंमलबजावणी करता यावी म्हणून अधिनियमातील कलम – 4 मधील 17 प्रकारची माहिती प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अद्यावत ठेवणे त्यांच्यावर बंधनकारक करण्यात आले। जनतेने कर रूपात दिलेल्या पैशातून सार्वजनिक प्राधिकरणांची उभारणी व कामकाज चालत असल्याने ते आपल्या कार्यासाठी जनतेला उत्तरदायी आहेत। करीता त्यांच्या कार्यात पारदर्शकता असणे अपेक्षित आहे।

कलम– 4 अंतर्गत असलेली 17 प्रकारची माहिती कोणीही मागितली नाही तरी कायदेशीर जबाबदारी म्हणून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने स्वतःहून दयावयाची आहे। सार्वजनिक प्राधिकरणांना स्वंयप्रेरणेने करावयाचे प्रकटन ही समाजापुढे आपल्या कामातील पारदर्शकता सादर करावयाची एक संधीच आहे। अशी माहिती खुलेपणाने, विस्तृतस्वरूपात व सतत दिल्यास माहिती मागणारे अर्ज नक्कीच कमी येतील। या कायदयाला देखील हेच अपेक्षित आहे।

**संदर्भ ग्रंथ सूची**


1. माहितीचा अधिकार अधिनियम, A Milind Junghare, Pune.
2. माहितीचा अधिकार अधिनियम, 2005,Yashada, 7th Edition RajhansPrakashan, Pune 2007
3. माहितीचा अधिकार अधिनियम, 2005, Yashada, 12th Edition Rajhans Prakashan, Pune 2007.
4. माहितीचा अधिकार अधिनियम, 2005, संदर्भ साहित्य यशदा, पूणे।
5. A Handbook of Right to Information Act, 2005, Yashada, Pune.
6. माहितीचा अधिकार अधिनियम, 2005, वाचन साहित्य, माहितीचा अधिकार, यशदा, पुणे।
7. माहितीचा अधिकार अधिनियम, 2005, नागरिकांसाठी मार्गदषिका, यशदा, पुणे।
8. माहितीचा अधिकार कायदा अंमलबजावणीची दिशा,किरण कुलकर्णी, यशदा, पुणे।
9. Sood RD. RTIA2008: Jaipur; Sublime Publication 2008.
10. Srinivas Madhav: RTIAAVaccine against corruption (Along with allied Laws, Rules &Notifications) A Asia Law House Hyderabad 2006.
11. Yashada, Right to Information ActA2005: A Primer: TMH, Pune.
12. Ed. Saini PK. Right to Information ActA2005: Implementation and Challenges A Deep & Deep, New Delhi 2009.